## नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कर आकारणी विभाग

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-‘ड’, प्रकरण ८ (कराधान नियम) नियम १३, १५ व २१ अन्वये.)**

# जाहिर नोटिस

नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतधारक / भोवटादार यांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ करीता आकारणी रजिष्टर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-‘ड’ प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ९ खंड (क), (ख), (ग) आणि (घ) अन्वये आवश्यक असलेल्या नोंदी, व्यवहार्य असेल तितपत, पुर्ण करण्यात आल्या आहे. व नियम २१ (१) अन्वये निकट पूर्वीच्या वर्षाच्या (सन २०१९-२०२०) पुस्तकातील नोंदी नवीन वर्षाच्या नोंदी म्हणुन सन २०२०-२१ करिता स्विकारल्या आहेत.

मालमत्ता कर आकारणी पुस्तक (नोंदवही) महानगरपालिकेच्या नाशिक पूर्व, नाशिक पश्चिम, पंचवटी, नाशिक रोड, सातपूर व नविन नाशिक या विभागीय कार्यालयात मिळकतीची माहिती मिळकतधारक/भोगवटादार यांना पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

ज्या मिळकतधारक/भोगवटादार यांना मिळकतकर आकारणी पुस्तकामधील कोणत्याही नोंदी बाबत तक्रार अथवा हरकत घ्यावयाची असेल त्यांनी आपल्या हरकती नियम १६ अन्वये हरकत अर्जात ज्या कारणावरुन मुल्य निर्धारणाविरुध्द तक्रार करण्यात आलेली आहे, त्या सबळ कारणासह लेखी स्वरुपात, संबंधित विभागीय कार्यालयात दि. २०/०२/२०२० अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अगर तत्पूर्वी मिळेल अशा रितीने समक्ष अथवा पोस्टाद्वारे सादर करावयाचा आहे. मुदतीनंतर येणाऱ्या हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तथापी हरकत अर्ज करतांना अर्जा सोबत दि. ३१/०३/२०२० पावेतोची संपुर्ण कराची रक्कम भरणा करुन त्यापावतीची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे मिळकतीबाबत यापुर्वी ज्या कारणास्तव निकाल दिलेला आहे, अशा प्रकारचे तत्सम मुद्दयांचे पुर्नर अर्ज तसेच नियम १६ (२) प्रमाणे ज्या कारणांवरुन मुल्यनिर्धारणाविरुध्द तक्रार करण्यात आली आहे, ती कारणे थोडक्यात, परंतु संपूर्णपणे नमूद करण्यात आली पाहिजेत याप्रमाणे नसल्यास अशा अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

तरी सर्व मिळकतधारक/भोवटादार यांनी हरकत असल्यास दिलेल्या वेळेत त्या नोंदविण्यात याव्यात याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-
उपआयुक्त (कर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

स्वाक्षरी /-
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक